MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co.Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN No. U40109MH2005SGC153646)

## जाहिरात क्र.१०/२०२३
## (अनुसुचित जमातीकरीता विशेष भरती मोहिम)

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि. ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१.१२.२०१९ ला अनुसरून, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे सांघिक कार्यालय, मुंबई येथील आस्थापनेवरील वेतनगट - ३ तसेच म.रा.वि.पारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळ कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात खाली नमुद केल्याप्रमाणे वेतनगट - ४ मधील रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरणे करीता केवळ **अनुसुचित जमातीतील** पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

## १. रिक्त पदांचा तपशील :

| अनु.क्र. | पदाचे नाव | पद रिक्त असलेल्या कार्यालयाचे नाव | एकुण पदे |
|---|---|---|---|
| १ | टंकलेखक (मराठी) | सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, मुंबई | १ |
| २ | "विद्युत सहाय्यक (पारेषण)" (कंत्राटी)<br>(पूर्वीचे पदनाम सहाय्यक तंत्रज्ञ (सामान्य)) | १) अउदा संवसु विभाग, बोईसर<br>२) अउदा संवसु विभाग, पनवेल<br>(अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, वाशी अंतर्गत) | १<br>१ |
| | | **एकूण** | **३** |

१.१ टंकलेखक (मराठी) या पदावर निवड झालेल्या उमेदवाराची पदस्थापना नियमित आस्थापनेवर करण्यात येईल.

१.२ "विद्युत सहाय्यक (पारेषण)" या पदी निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम ३ वर्षांच्या कंत्राटी कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक वर्ष संपल्यावर त्यांच्या मागील वर्षाच्या कामाचा आढावा घेण्यात येईल. त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांचा कंत्राटी कालावधी चालू ठेवण्यात येईल.

१.३ "विद्युत सहाय्यक (पारेषण)" या पदाचा ०३ वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर अनुशेष आणि रिक्तपदे यांचा विचार करुन व कंपनीची गरज विचारात घेवून कंपनीच्या नियमांच्या अधीन राहून "सहाय्यक तंत्रज्ञ (सामान्य)" या नियमित पदावर सामावून घेण्याबाबतचा निर्णय कंपनी प्रशासन घेईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## २. वेतनश्रेणी/मानधन :

२.१ निवड झालेल्या उमेदवारास खालील वेतनश्रेणी नुसार वेतन लागू राहील.

| अनु.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी/मानधन (रु.) |
|---|---|---|
| १. | टंकलेखक (मराठी) | या पदावर निवड झालेल्या उमेदवारास रु. २९०३५-७१०-३२५८५-९५५-४२१३५-१०६०-७२८७५ या वेतन श्रेणीत वेतन मिळेल.<br>मुळ वेतनाव्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वैद्यकीय भत्ता वगैरे भत्ते कंपनीच्या नियमाप्रमाणे लागु राहतील |

| अनु.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी/मानधन (रु.) |
|---|---|---|
| २. | “विद्युत सहाय्यक (पारेषण)” (कंत्राटी) {(पूर्वीचे पदनाम सहाय्यक तंत्रज्ञ (सामान्य)} | या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम ३ वर्षाच्या कंत्राटी कालावधी करीता खालीलप्रमाणे एकत्रित मानधन देण्यात येईल.<br>अ) प्रथम वर्ष - एकत्रित मानधन रुपये १५०००/- दरमहा<br>ब) द्वितीय वर्ष - एकत्रित मानधन रुपये १६०००/- दरमहा<br>क) तृतीय वर्ष - एकत्रित मानधन रुपये १७०००/- दरमहा<br>उपरोक्त मानानातून भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर, मेडिक्लेम इ. वजावट नियमानुसार करण्यात येईल. |

## ३. शैक्षणिक अर्हता (दिनांक २६.१२.२०२३ पर्यंत ) :

३.१ उमेदवारांनी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण केलेली असावी:-

**शैक्षणिक अर्हता**

**१) टंकलेखक (मराठी)**

- Should have passed S.S.C. Examination or its equivalent recognised by the Govt. Of Maharashtra.
- Ability to type Marathi neatly and accurately and at the speed of 30 w.p.m.
  (शासकीय परिक्षा मंडळाचे मराठी टंकलेखनाची गती ३० श.प्र.मि. असल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.)

**२) “विद्युत सहाय्यक (पारेषण)” (कंत्राटी)**

शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारक.

**किंवा**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून वीजतंत्री व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र धारक.

**किंवा**

Candidate who has completed a course of 2 years duration under the scheme of **Centre of Excellence (Electrical Sector) awarded by the NCTVT, New Delhi as per following details & Period :**

| | | |
|---|---|---|
| Basic Courses | 1 Year | Board Based Basic Training Course in Electrical Sector (BBBT). |
| Advance Course/Module | 6 months | Training in Advanced modules for next six months in following modules after BBBT.<br>**“Operation & Maintenance of Equipment used in HT, LT, Substation & cable jointing”.** |
| Apprenticeship Training | 6 months | 6 months apprenticeship in the trade of Mechanic (HT, LT Equipment’s and Cable Jointing) Under Apprenticeship Act -1961 awarded by NCTVT, New Delhi. |
| The candidate should have completed & cleared each above courses / training / apprenticeship for which he should possess mark sheets & training / passing certificates awarded by NCTVT, New Delhi. | | |

३.२ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि. २६.१२.२०२३ पर्यंत संबंधित शैक्षणीक अर्हता संपादित केलेली असणे आवश्यक आहे. सदर विहित केलेल्या अंतिम दिनांकानंतर शैक्षणिक अर्हता संपादित केलेल्या उमेदवारांनी जरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले तरी असे उमेदवार अपात्र ठरतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**टिप**:-[ **टंकलेखक (मराठी)या पदासाठी**]:-

उमेदवाराने MS-CIT किंवा MS-CIT परिक्षेच्या समकक्ष संगणक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे.

## ४. वयोमर्यादा:

४.१ दोन्ही पदांसाठी दि २६.१२.२०२३ रोजी उमेदवाराचे किमान **वय १८ वर्षे व कमाल वय ४३ वर्षे.** वयोमर्यादेकरीता माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (एस.एस.सी.) प्रमाणपत्रावर नोंदविलेली / दर्शविलेली जन्मतारीख ग्राहय धरण्यात येईल.

४.२ महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सनिव २०२३/ प्र.क्र.१४/ कार्या-१२ दि.०३.०३.२०२३ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत ०२ वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

४.३ महापारेषण कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ५७ वर्षे राहील.

४.४ "विद्युत सहाय्यक (पारेषण)" (कंत्राटी) या पदाकरीता तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या विजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांकरीता त्यांच्या प्रशिक्षण कालावधी इतकी कमाल वयोमर्यादा शिथीलक्षम राहील.

## ५. आरक्षण :

५.१ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. उमेदवारास अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.२६.१२.२०२३ रोजी वैध असलेले सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. त्यामुळे ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र नसेल त्यांनी ते दि.२६.१२.२०२३ पुर्वी प्राप्त करुन घ्यावे.

५.२ जातीच्या दाव्याच्या पुष्ठर्थ अनुसुचित जमातीतील उमेदवारांनी अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.२६.१२.२०२३ रोजी वैध असलेला सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेला जातीचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१.१२.२०१९ नुसार उमेदवारांनी जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले 'जात वैधता प्रमाणपत्र' अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

५.३ सामाजिक आरक्षणाच्या तसेच वयाच्या व परीक्षा शुल्काच्या लाभासाठी फक्त महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिका-यांनी जारी केलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

## ६. निवड पध्दती:

६.१ अर्ज सादर केलेल्या सर्वच उमेदवारांना लेखी/ऑनलाईन परिक्षेस बोलविण्यात येईल.

६.२ ऑनलाईन परीक्षेसाठी उमेदवारांना बोलविण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची पडताळणी केली जाणार नाही. त्यामुळे परीक्षेला बोलविले म्हणजे उमेदवार त्या पदासाठी पात्र आहे असे समजले जाणार नाही. उमेदवाराची अंतिम निवड ही त्याच्या पात्रतेसंबंधीच्या कागदपत्रांची पडताळणी करूनच केली जाईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.३ अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तूनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा ही पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता (Educational Qualification) व सामान्य अभियोग्यता चाचणी (General Apptitude) यावर आधारित राहील. ऑनलाईन परिक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील:-

| अनु.क्र. | विषय/उपविषय | प्रश्न | गुण | परिक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | विषयाचे ज्ञान (Professional Knowledge) | ५० | ११० | एकत्रित कालावधी १२० मिनीट |
| २. | सामान्य अभियोग्यता (General Aptitude)<br>अ) तर्कशक्ती (Reasoning)<br>ब) संख्यात्मक अभियोग्यता (Quantitative Aptitude)<br>क) मराठी भाषा (Marathi Language) | <br>४०<br>२०<br>२० | <br>२०<br>१०<br>१० | |
| | **एकुण** | **८०** | **४०** | |
| | **एकुण (१+२)** | **१३०** | **१५०** | |

६.४ उमेदवाराने दिलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांना शास्ती /दंड (Penalty) असेल. त्यानुसार त्या प्रश्नास विहित असलेल्या एकुण गुणांच्या १/४ (०.२५%) इतके गुण दंड म्हणून प्राप्त गुणांमधून वजा करण्यात येऊन अंतिम गुण काढण्यात येतील. तथापि, उमेदवाराने एखादया प्रश्नाचे उत्तर न दिल्यास / रिक्त ठेवल्यास अशा प्रश्नांना शास्ती /दंड (Penalty) लागणार नाही.

६.५ उमेदवाराने उपरोक्त नमुद विषयाचे ज्ञान, सामान्य अभियोग्यता अंतर्गत तर्कशक्ती, संख्यात्मक अभियोग्यता व मराठी भाषा या सर्व विषयांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त नमुद चाचणी परीक्षेतील कुठल्याही विषयात/उप विषयात उमेदवारास शून्य अथवा शून्यापेक्षा कमी गुण असल्यास सदर उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. त्यामुळे अशा उमेदवारांनी जरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले असले तरी त्यांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.६ उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. तथापि, विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) या पदाच्या नियुक्तीपुर्वी उमेदवाराची विहित शारीरीक व वैद्यकीय चाचणी व तपासणी करण्यात येईल. या शारीरिक चाचणी/वैद्यकीय तपासणीत उमेदवारास पात्र होणे आवश्यक राहिल. याबाबतचे निकष निवडीपुर्वी प्रशासनातर्फे स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येतील. त्यामुळे उमेदवाराने अशा विहित केलेल्या शारिरिक व वैद्यकिय चाचणी/तपासणीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल व तसे न झाल्यास सदर उमेदवाराने जरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले असले तरी त्यांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.७ विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) या पदासाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने तदर्थ म.रा.वि.मंडळ/ महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या वीजतंत्री या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेले असल्यास व जाहिरातीतील सर्व अर्हता धारण करत असल्यास त्यास परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १० टक्के अधिक गुण त्याच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. त्यासाठी उमेदवाराने वीजतंत्री या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या अंतिम तारखेस धारण करणे आवश्यक आहे.

६.८ महापारेषण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत/काम केलेल्या तसेच विहीत अर्हता पुर्ण केलेल्या कंत्राटी कामगारांच्या हितार्थ महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या मंजुरीनुसार महापारेषण कंपनीत बाह्यस्त्रोताद्वारे कार्यरत/काम केलेल्या तसेच विहीत अर्हता पुर्ण केलेल्या तांत्रिक कंत्राटी कामगारांना त्यांच्या मागील अनुभवाच्या आधारे त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांमध्ये प्रतीवर्ष ०२ गुण या प्रमाणे ०५ वर्षांकरीता कमाल १० अतिरिक्त गुण देण्यात येतील व अशा प्रकारे ऑनलाईन परिक्षेत १५० पैकी मिळविलेले गुण व अतिरिक्त गुण यांचे रुपांतरण १०० गुणांत करुन निवडसूचीत गुणवत्तेनुसार समावेश करण्यात येईल.

६.९ अंतिम गुणवत्ता यादी /निवडसुची तयार करतांना उमेदवारास ऑनलाईन परिक्षेत एकुण १५० गुणांपैकी मिळविलेल्या गुणांचे रूपांतरण १०० गुणांत करुन अंतिम यादी /निवडसुची तयार करण्यात येईल. अंतिम निवड यादीत स्थान मिळविण्याकरीता उमेदवारास १०० गुणांपैकी कमीत कमी २० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. उमेदवाराने तेवढे कमीत कमी गुण प्राप्त न केल्यास त्याची निवड होणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व निवड यादी त्या मर्यादेत राखण्यात येईल.

६.१० ज्या उमेदवारांचे परिक्षेत मिळालेले गुण समान असतील त्यामधील म.रा.वि. मंडळात अथवा महापारेषण कंपनीकडे शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. अन्य दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात येईल.

६.११ सामान्यतः उपरोक्त नमुद केलेल्या निवड पद्धतीचे अनुसरण करण्यात येईल. तथापि, कोणत्या निवड पद्धतीचा अवलंब करायचा हे ठरविण्याचा अधिकार व निर्णय पुर्णपणे कंपनीचा असेल.

## ७. निवड झालेल्या उमेदवारांच्या पदस्थापनेबाबत:

७.१ विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त पदे व अनुशेषाच्या अनुषंगाने या जाहिरातीत नमुद केलेल्या परिमंडलास / कार्यालयास पदस्थापनेसाठी वर्ग करण्यात येईल. तर टंकलेखक या पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराची पदस्थापना मुख्य कार्यालय, बांद्रा (पू), मुंबई येथे करण्यात येईल.

७.२ या उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहिल.

## ८. परिक्षा केंद्र :

८.१ ऑनलाईन परिक्षेकरीता निश्चित केलेली परिक्षा केंद्रे खालील प्रमाणे असतील.
***अहमदनगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपुर, धुळे, जळगाव,कोल्हापूर, लातूर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर.***

८.२ उमेदवारांनी प्राधान्यक्रमाने तीन परिक्षा केंद्रांची नावे अर्जात नमूद करावीत ज्यायोगे उमेदवारास त्यांनी नोंदविलेल्या परिक्षा केंद्रांच्या पर्यायानुसार तीन केंद्रांपैकी एक केंद्र परिक्षेसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

८.३ तथापि, त्या तीनही केंद्रासाठी आवश्यक असलेल्या किमान उमेदवारांची नोंदणी न झाल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रशासकीय अथवा इतर कोणत्याही कारणांमुळे त्या केंद्रावर परीक्षा घेता येणार नसल्यास अथवा त्या उमेदवारास त्या परिक्षाकेंद्रावर देता येत नसल्यास सदर उमेदवारांना उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही परिक्षा केंद्रावर परिक्षेसाठी वर्ग करण्यात येईल. याबाबत कंपनी प्रशासनाचा निर्णय अंतीम असेल व तसे अधिकार कंपनी राखून ठेवत आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८.४ उमेदवाराने निवड केलेल्या केंद्रांवर त्या केंद्राच्या क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्यास या कारणामुळेही उमेदवारास अन्य उपलब्ध केंद्रावर वर्ग करण्यात येईल.

८.५ उमेदवारास परिक्षेसाठी कोणते केंद्र ठेवावे याबाबतचा तसेच कोणतेही केंद्र बदलण्याचा, वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा कंपनी प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील.

८.६ उमेदवाराने अर्जात निवडलेले परिक्षा केंद्र अंतिम असेल. परिक्षाकेंद्र/परिक्षेचे स्थळ/तारिख/सत्र बदलण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.

८.७ ऑनलाईन परिक्षेसाठीच्या प्रवेश पत्रावर परिक्षा केंद्राचा संपुर्ण तपशील देण्यात येईल.

८.८ उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वतःच्या जोखीमेवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

## ९. परिक्षा शुल्क:

९.१ उमेदवाराने खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरावे.

| अनु. क्र. | पदनाम | परिक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | टंकलेखक (मराठी) | रु. ३००/- |
| २ | विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) | रु. २५०/- |

९.२ उमेदवाराने "महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्या." यांच्या नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत काढलेला व मुंबई येथे वटनारा वर नमुद केलेल्या आवश्यक त्या रकमेचा (CTS कोड असलेला) डिमांड ड्राफ्ट अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराने डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस त्याचे संपुर्ण नाव आणि ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे पदनाम लिहावे.

९.३ डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वरुपाने भरलेले परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

९.४ CTS कोड शिवाय सादर केलेला डिमांड ड्राफ्ट स्विकारला जाणार नाही. जर उमेदवाराने CTS कोड नसलेला डिमांड ड्राफ्ट सादर केला तर अशा उमेदवाराने अर्ज विहीत पध्दतीने सादर केला नाही म्हणून त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

९.५ विहीत शुल्कापेक्षा कमी शुल्क भरल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९.६ सदर परिक्षा शुल्क हे "ना परतावा" राहील व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

## १०. अर्ज सादर करण्याची पध्दत:

१०.१ या जाहिरातीच्या शेवटी दिलेल्या नमुन्यात सादर केलेले अर्जच ग्राह्य धरण्यात येतील. सदर अर्ज दिलेल्या क्रमात कोणताही बदल न करता फुल स्केप पेपर वर टायपिंग करुन करावा.

१०.२ उमेदवाराने अर्जात आवश्यक ती पुर्ण माहिती भरुन, त्याखाली स्वाक्षरी करुन, अर्जा सोबत मुळ डिमांड ड्राफ्ट, वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव (आवश्यकता असल्यास),जात, जात वैधता, महाराष्ट्र राज्याचा अधिवासी, इ. बाबतची साक्षांकित (attested) केलेली आवश्यक ती कागदपत्रे जोडून, लिफाफ्यात बंद करुन लिफाफ्यावर **"जाहिरात क्र.१०/२०२३"** व ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे **त्या पदाचे पदनाम** उ.दा.**[टंकलेखक (मराठी) अथवा "विद्युत सहाय्यक (पारेषण)(कंत्राटी)"]** असे लिहावे व "मुख्य महाव्यवस्थापक (मासं)" महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्या, प्रकाशगंगा, ई-ब्लॉक, प्लॉट नं. सी -१९, ७ वा मजला, मानव संसाधन विभाग, बांद्रा-कुर्ला संकुल बांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ यांना दि. २६.१२.२०२३ पुर्वी सादर करावे. महापारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना अर्ज योग्य मार्गे (Through proper channel) सादर करणेची आवश्यकता नाही.

१०.३ उमेदवारांनी अर्जाची एक प्रत, डिमांड ड्राफ्ट तसेच सर्व कागदपत्रांचा एक संच (फोटोकॉपी) पुरावा म्हणून स्वतःकडे ठेवावा.

१०.४ उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, महाराष्ट्र अधिवास, जात, तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीकडे शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेली असणे, महापारेषण कंपनीच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत प्रशिक्षण घेत /पुर्ण केले असल्याबाबत, वगैरे बाबींची सिध्दता करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

१०.५ भरती प्रक्रियेबाबतच्या पुढील सुचना ईमेल व भ्रमणध्वणी क्रमांकावर देण्यात येणार असल्याने उमेदवाराने आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल ही भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वापरात ठेवण्याची खबरदारी घ्यावी. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल भरती प्रक्रिया पुर्ण होण्या अगोदर बंद झाल्यास व त्यास ईमेल / संदेश प्राप्त न झाल्यास कंपनी जबाबदार रहाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०.६ अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांका नंतर प्राप्त झालेले अर्ज (कोणत्याही कारणास्तव) विचारात घेतले जाणार नाहीत. या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०.७ अपुर्ण, स्वाक्षरी शिवाय आवश्यक त्या रक्कमेचा, मुळ डिमांड ड्राफ्ट शिवाय अथवा आवश्यक त्या प्रमाणपत्रा शिवाय / साक्षांकित प्रमाणपत्रा शिवाय प्राप्त झालेले अर्ज सरसकट नाकारले जातील.

१०.८ तदर्थ म.रा.वि.मंडळ/ महापारेषण कंपनीमध्ये यशस्वीरित्या वीजतंत्री या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांनी कार्यकारी अभियंता व त्या वरिल पदाच्या अधिकाऱ्याने जारी केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

१०.९ उमेदवाराने एकदा अर्ज सादर केल्यानंतर अर्जाच्या माहितीत बदल करणे किंवा नव्याने कागदपत्रे जोडणे याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही.

१०.१० **महिला उमेदवारांसाठीः-**

महिला उमेदवारांनी लग्नानंतर नावात बदल केला असल्यास ते नव्या नावाने अर्ज भरू शकतात. परंतू अर्ज सादर करताना त्यांनी अर्जात पुर्वीचे नाव व सुधारित नाव नमूद करणे आवश्क आहे. परिक्षेस उपस्थित राहतांना अशा महिला उमेदवारांना Call Letter मध्ये नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे Call Letter मध्ये नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०.११ उमेदवारांनी एकापेक्षा जास्त वेळेस अर्ज केला असल्यास अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा शेवटचा अर्ज व त्यामधील माहिती ग्राहय धरण्यात येऊन अगोदरचा अर्ज / माहिती रद्दबातल ठरविण्यात येईल.

१०.१२ कोणत्याही बाबतीत अपुर्ण माहिती जसे की, छायाचित्र, स्वाक्षरी इ. शिवाय असलेला अर्ज वैध मानला जाणार नाही.

१०.१३ परिक्षेसंबंधीची माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

## ११. परीक्षेस हजर राहण्या संबंधिच्या सूचनाः

११.१ परिक्षेस उपस्थित राहण्यासाठी फक्त महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध Call Letter च ग्राह्य धरले जाईल, ते सोबत आणावे.

११.२ तसेच खाली नमूद केल्यापैकी कोणतेही एक मुळ (Original) ओळखपत्र व एक फोटोकॉपी परिक्षेस सोबत येतांना न चुकता आणावी.

११.३ ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत प्रत Colour Copy ग्राह्य धरली जाणार नाही 'पॅन कार्ड (PAN Card) /पासपोर्ट (Passport)/वाहन परवाना(Driving License)/मतदार ओळखपत्र (Voter's Card)/अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with Photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र/लोकप्रतिनिधिंनी अधिकृत Letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र/ मान्यताप्राप्त महाविद्यालय/ विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (Valid Recent Identity Card issued by a recognized College/ University) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar Card with a Photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID)'

११.४ रेशन कार्ड व शिकाऊ वाहन परवाना (Learner's Driving License) हे वैध ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

११.५ परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

११.६ परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने Call Letter वर नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

११.७ **परिक्षा केंद्रावर उशिराने उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांसाठी सुचना:-**

प्रवेश पत्रावर (Call Letter वर) नमुद केलेल्या वेळेनंतर परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही. प्रवेश पत्रावर (Call Letter वर) नमुद केलेली वेळ ही परिक्षा सुरु होण्याच्या वेळेपुर्वीची आहे. परिक्षेचा कालावधी हा फक्त दोन तासांचा असला तरी उमेदवारास परिक्षा केंद्रावर औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की, ओळखपत्रांची तपासणी, कागदपत्रांची पडताळणी व संकलन, लॉग इन करणे, उमेदवारांना परिक्षेसंबंधी सुचना देणे वगैरे बाबी पुर्ण करण्यासाठी सुमारे ४ तास परिक्षाकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक राहील.

११.८ **ओळखपत्र तपासणी:-**

परिक्षा केंद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारांचे Call Letter व मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

## १२. भरती प्रक्रियेचा कार्यक्रम:

| | | |
|---|---|---|
| १) | अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक | दिनांक २६.१२.२०२३ पर्यंत.<br>(सायंकाळी ०६.१५ मिनीटांपर्यंत) |
| २) | परीक्षेची अंदाजीत तारीख | फेब्रुवारी/मार्च - २०२४ |

## १३. सर्वसाधारण अटी व शर्ती:

१३.१ जाहिरातीत नमुद केलेल्या पदासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने विहित शैक्षणिक अर्हता, वय, महाराष्ट्र अधिवास, जात, प्रकल्पग्रस्त वगैरे त्यास लागू असलेल्या बाबी धारण केलेल्या आहेत याची खात्री करुनच अर्ज करावा.

१३.२ जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही '**किमान**' अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता धारण केली आहे हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

१३.३ या जाहिरातीला अनुसरुन पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत व विहित नमुन्यात सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. अन्य पध्दतीने व अन्य नमुन्यात सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१३.४ उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे एक आवश्यक बाब म्हणून **‘लहान कुटुंब’** असल्याचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

१३.५ उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबत खालील प्रमाणे प्रमाणपत्र हे कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील :

माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र अथवा मान्यता प्राप्त विद्यापिठातील / दहावी किंवा त्यावरिल परिक्षा मराठी विषयासह उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र

किंवा

मान्यताप्राप्त विद्यापिठ / संस्थाकडील प्राध्यापकाने उमेदवारास मराठी भाषा लिहीता व वाचता येत असल्याबद्दलचे प्रमाणपत्र व त्यावर सदर विद्यापीठ/संस्थेच्या प्राचार्याने प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र.

१३.६ निवड झालेल्या उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तथापि निवड झालेल्या ज्या उमेदवारांकडे मुद्दा क्र. १३.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र नसल्यास अशा उमेदवारांस सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून ३ वर्षांच्या आत विभागीय मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

१३.७ उमेदवारांना परीक्षेकरिता स्वखर्चाने यावे लागेल. याकरीता कोणत्याही प्रकारच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

१३.८ भरती प्रक्रियेस विलंब होणे, परिक्षा पुर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परिक्षा वेळेवर पार पाडण्याचे/परिक्षा पुन्हा सुरु करण्याचे/निवड प्रक्रिया पुर्ण करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील. तथापि आवश्यकता भासल्यास पुन्हा परिक्षा देखील घेतली जावू शकते. याबाबत कंपनी प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३.९ परीक्षा कक्षात मोबाईल दुरध्वनी अथवा इतर कोणतेही दूरसंचार साधन (Electronic Device) घेवून जाण्यास परवानगी नाही.

१३.१० परीक्षेच्यावेळी मद्य आणि/किंवा मादक अमली पदार्थाचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारांवर उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३.११ महापारेषण कंपनीने जाहिरातीत तसेच विविध सुचनांद्वारे प्रासारीत केलेल्या सुचना, अटी, शर्ती मान्य नसलेल्या,कोणत्याही प्रकारे गैरप्रकार करणाऱ्या, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारास ह्या प्रक्रियेतून आणि / अथवा भविष्यातील सर्व भरती प्रक्रियेसाठी प्रातिरोधीत (Debarred) करण्यात येईल.

१३.१२ गैरवर्तणूकीचे स्वरुप गंभीर असल्यास अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर अपात्र ठरविण्यात येईल शिवाय अशा उमेदवारांविरुध्द भारतीय दंडसंहिता आधारभूत कठोर कारवाई देखील केली जावू शकते याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३.१३ विहित वयोमर्यादेतील व पात्र अशा शासकीय / निमशासकीय सेवेतील / शासकीय उपक्रमातील कर्मचा-यांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या संस्थे मधून / कंपनीच्या सेवेमधून कार्यमुक्त केल्याचे प्रमाणपत्र रुजू होते वेळी सादर करणे आवश्यक राहील. मात्र त्यांच्या पूर्वीच्या संस्थेतील /कंपनीतील सेवेची व देयकांची (Service Bond / Training Bond, etc.) कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

१३.१४ उमेदवाराने जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्सर चूकीची/खोटी माहिती अथवा कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केल्यास अथवा माहिती दडविली आहे असे आढळल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती नंतरही अपात्र ठरविण्यात येईल अथवा त्यांचे पूर्वचारित्र्यात गैर असल्याचे आढळून आल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि नियुक्ती दिली असल्यास कोणत्याही नोटीसीशिवाय किंवा कोणतेही कारण न देता बडतर्फ करण्याचा अधिकार कंपनी प्रशासनास राहील.

१३.१५ महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्याने भरती प्रक्रियेसाठी खोटी माहिती /खोटी कागदपत्रे /प्रमाणपत्रे सादर केली आहे असे कुठल्याही टप्प्यावर आढळल्यास त्यांस भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. मात्र, अशा उमेदवाराची नियुक्ती झाली असल्यास त्यांनी भरती आधी धारण केलेल्या पदावर पदावनत करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच अशा कर्मचा-यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार कंपनी प्रशासन राखून ठेवते.

१३.१६ भरती प्रक्रियेत उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचा अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३.१७ निवड झालेल्या विभागीय उमेदवारास (महापारेषण कंपनीच्या कर्मचा-यास) नियुक्ती आदेश हा विचाराधीन / सुरु असलेल्या शिस्तभंग विषयक कारवाईचा अहवाल विचारात घेऊन तसेच दक्षता चौकशी व इतर सेवाविषयक नोंदी विचारात घेऊन जारी करण्यात येईल. सदर प्रकरणी कंपनी प्रशासनाचा निर्णय अंतिम राहिल. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा वैयक्तिक पातळीवर पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१३.१८ निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निकाल जाहिर केल्याच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत राहील. त्यानंतर ही निवड सूची कंपनीच्या नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१३.१९ जाहिरातीत किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः किंवा संपूर्ण बदल करण्याचे तसेच, जाहिरात अंशतः किंवा पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार कंपनी प्रशासन राखुन ठेवित आहे. याबाबतचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविणे कंपनीस बंधनकारक नसेल.

१३.२० जाहिरातीतील पदांच्या भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

१३.२१ भरती प्रक्रिये संबंधीची माहिती वेळोवेळी कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावरील "करियर" (Career) ह्या सदराखाली प्रसिध्द करण्यात येईल. संबंधीत उमेदवारांनी भरती प्रक्रियेसंबंधीच्या अद्ययावत माहितीसाठी कंपनीचे संकेतस्थळ वेळोवेळी पहावे.

१३.२२ या जाहिरातीच्या अनुषंगाने निर्माण झालेला कोणताही विवाद हा मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाच्या कार्यक्षेत्रात असेल.

१३.२३ उपरोक्त सर्व बाबी, सुचना, अटी, शर्ती मान्य करुनच उमेदवाराने अर्ज सादर करावा.

**दिनांक:** ०६.१२.२०२३ सही/-

**स्थळ :** मुंबई मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन)

********

# अर्जाचा नमूना

## (जाहिरात क्र.१०/२०२३)

(अर्ज भरण्यापूर्वी जाहिरातीत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात)

(योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी)

| तुमचा अलीकडील ओळखता येणारा पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवा आणि अर्धी स्वाक्षरी फोटो वर व अर्धी स्वाक्षरी अर्जावर येईल अशा पद्धतीने स्वाक्षरी करा |
|---|

**१) अर्ज सादर करीत असलेल्या पदाचे नाव:-** ______________________________

**२) उमेदवाराचे संपूर्ण नाव:-** (मराठी मध्ये)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्वत:चे नाव** | | | | | | | | | | | | | | | |
| **वडिलांचे/पतीचे नाव** | | | | | | | | | | | | | | | |
| **आडनाव** | | | | | | | | | | | | | | | |

**३) उमेदवाराचे संपूर्ण नाव:- ( इंग्रजी मध्ये)**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **First Name** | | | | | | | | | | | | | | | |
| **Middle Name** | | | | | | | | | | | | | | | |
| **Surname** | | | | | | | | | | | | | | | |

**४) उमेदवाराने आपले नाव बदलले आहे काय?** ☐ **होय** ☐ **नाही**
**(नाव बदलले असल्यास वैध प्रमाणपत्र सोबत जोडावे)**

- **पूर्वीचे नाव (संपूर्ण)** :- ______________________________
- **नवीन नाव (संपूर्ण)** :- ______________________________

**५) पत्र व्यवहाराचा पत्ता :-**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| पि | न | क्र. | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**६) कायमचा पत्ता :-**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| पि | न | क्र. | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

७) **ईमेल आयडी:-** ______________________________

८) **दूरध्वनी क्र. (१० अंकी मोबाईल क्र.):-** १) __________________________

२) __________________________

९) **जन्मतारीख :-**

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

१०) **दि. २६.१२.२०२३ रोजीचे वय :-**

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

११) **उमेदवार महापारेषण कंपनीचा कर्मचारी आहे का?** होय ☐ नाही ☐

- **महापारेषण कंपनीचा कर्मचारी असल्यास.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **भनिनि क्र** | | | | | | | |
| एस.ए.पी **क्र.** | | | | | | | |

१२) **लिंग :-** पुरुष ☐ स्त्री ☐ तृतीय पंथी ☐

१३) **वैवाहिक स्थिति:-** विवाहित ☐ अविवाहित ☐ घटस्फोटीत ☐

१४) **जात प्रवर्ग:-** अनुसूचित जमाती ☐

१५) **उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आहे काय?**
होय ☐ नाही ☐

१६) **उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला आहे काय?**
होय ☐ नाही ☐

१७) **उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र आहे काय?**
होय ☐ नाही ☐

१८) **आपण तदर्थ म. रा. वि. मंडळ / म. रा.वि. पारेषण कंपनीमध्ये वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी पूर्ण केली आहे काय?** (केवळ विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) या पदाकरीता)
होय ☐ नाही ☐

**क) असल्यास शिकाऊ उमेदवारी कोठे पूर्ण केली :-**
अ) म. रा. वि. मंडळ ☐ ब) म. रा.वि. पारेषण कंपनी ☐

**ख) प्रशिक्षण कालावधी :-**

| पासून | पर्यंत |
|---|---|
| | |

**ग) प्रशिक्षण कालावधी (महिन्यात) :-**

| |
|---|
| |

**घ) शिकाऊ उमेदवारी ज्या कार्यालयात /उपकेंद्रात पुर्ण केली त्या कार्यालयाचे नाव व पत्ता :-**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

१९) **कंत्राटी आपण म.रा.वि. पारेषण कंपनीमध्ये कंत्राटी पद्धतीने कार्यरत होता/आहात काय ? (केवळ विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी)पदाकरीता)**

होय ☐ नाही ☐

**ङ)** असल्यास कंत्राटी पद्धतीने काम केल्याचा कालावधी :-

| पासून | पर्यंत |
|---|---|
| | |

**च)** एकूण कालावधी :-

| वर्ष | महिना |
|---|---|
| | |

**छ)** कंत्राटी पद्धतीवर ज्या कार्यालयात कार्यरत होता/आहात त्या कार्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता :-

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२०) **मराठी भाषेचे ज्ञान आहे काय?** होय ☐ नाही ☐

२१) **डिमांड ड्राफ्टची (CTS कोड असलेला) माहिती :-**

| डिमांड ड्राफ्ट जारी करणाऱ्या बँकेचे नाव, शाखा, शहराचे नाव | डिमांड ड्राफ्ट जारी केल्याची दिनांक | डिमांड ड्राफ्ट (६ अंकी) | MICR क्र. (९ अंकी ) | डिमांड ड्राफ्टची रक्कम (रु. मध्ये ) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

२२) **शैक्षणिक अर्हता (२६.१२.२०२३ पर्यंत):-**

| अनु. क्र. | परीक्षेचे नाव | शाळा / मंडळ / औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव / संस्था | विषय / प्रवाह Subject / Stream | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | टक्केवारी (%) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | S. S. C.<br>एस. एस. सी. (१० वी) | | | | | |
| २ | H. S. C.<br>एच. एस. सी. (१२ वी) | | | | | |
| ३ | मराठी टंकलेखन<br>(३० शब्द प्रती मिनिट) | | | | | |
| ४ | MSCIT किंवा समकक्ष परिक्षा | | | | | |
| 5 | I.T.I.<br>आय.टी.आय. | | | | | |

- शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले “वीजतंत्री” या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारक आहात का? होय ☐ नाही ☐

**किंवा**

- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून “वीजतंत्री” व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले “वीजतंत्री” या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र धारक आहात काय? होय ☐ नाही ☐

**किंवा**

- २ वर्ष कालावधीचा (NCTVT), नवी दिल्ली द्वारे पुरस्कृत **सेंटर ऑफ एक्सलन्स (विद्युत क्षेत्र)** अभ्यासक्रम पूर्ण केला आहे काय? होय ☐ नाही ☐

२३) **परिक्षेसाठी प्राधान्य क्रमाने तीन परीक्षा केंद्रांची निवड करावी (परिच्छेद क्र. ८.१ पहावे) :-**

१) परीक्षा केंद्र १:- ____________________

२) परीक्षा केंद्र २:- ____________________

३) परीक्षा केंद्र ३:- ____________________

२४) **प्रतिज्ञापत्र :-**

१) मी असे प्रमाणित करतो/करते की म. रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित कंपनीने प्रस्तुत पदासाठी दिलेली जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती व निवडप्रक्रिया मला मान्य आहेत.

२) मी असे प्रमाणित करतो/ करते की, मी वरील दिलेली माझी सर्व माहिती/ तपशील हा योग्य व अचूक आहे. त्यापैकी एखादी माहिती / तपशील कोणत्याही टप्प्यावर अयोग्य अथवा चुकीचा असल्यास/आढळल्यास मला अपात्र ठरविण्यात येईल.

३) मी असे प्रमाणित करतो/ करते की, माझ्याद्वारे अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रे खरी आहेत आणि जर कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कागदपत्र / प्रमाणपत्र खोटे / बनावट असल्याचे आढळल्यास**,** मला भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल आणि नियुक्ती झाली असल्यास कंपनीच्या सेवेतून बडतर्फ करण्यास मी पात्र राहील.

४) मी असे प्रमाणित करतो की आज रोजी मला _____ इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _____ एवढी आहे. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र होईल, याची मला जाणीव आहे.

५) मी घोषित करतो की मी कंपनीमध्ये महाराष्ट्रात कुठेही सेवा करण्यास तयार आहे.

६) मी जाहिरातीत नमूद केलेल्या निवडीच्या सर्व अटी आणि पद्धतींचे पालन करण्याचे वचन देतो

**उमेदवाराची स्वाक्षरी :-** ________________________________

**उमेदवाराचे संपूर्ण नाव:-** ________________________________

**ठिकाण :-**__________

**दिनांक:-** __________

| अर्जासोबत जोडावयची कागदपत्रे (साक्षांकीत प्रती):- | होय / नाही लिहावे |
|---|---|
| १) महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र | |
| २) महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला | |
| ३) महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र | |
| ४) नावात बदल झाल्याचा पुरावा (लागू असल्यास) | |
| ५) जन्म तारखेचे प्रमाणपत्र (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र /१० वी उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र ) | |
| ६) महापारेषण कंपनीचा कर्मचारी असल्यास कंपनीचे ओळख पत्र | |
| ७) तदर्थ म. रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीमध्ये वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र | |
| ८) मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ९) राष्ट्रीय व्यवसाय परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले "वीजतंत्री" या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र | |
| १०) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून "वीजतंत्री" व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले "वीजतंत्री" या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र | |
| ११) २ वर्ष कालावधीचा (NCTVT), नवी दिल्ली द्वारे पुरस्कृत **सेंटर ऑफ एक्सलन्स (विद्युत क्षेत्र)** अभ्यासक्रम केल्याचे प्रमाणपत्र | |
| १२) S. S. C. एस. एस. सी. (१० वी) प्रमाणपत्र | |
| १३) H. S. C. एच. एस. सी. (१२ वी) प्रमाणपत्र | |
| १४) MSCIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केली असल्याचे प्रमाणपत्र | |
| १५) शासकीय परिक्षा मंडळाचे मराठी टंकलेखनाची गती ३० श.प्र.मि. असल्याचे प्रमाणपत्र | |
| १६) डिमांड ड्राफ्ट (CTS कोड असलेला) | |
| १७) डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस स्वतःचे संपूर्ण नाव आणि ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे पदनाम लिहिले आहे काय? | |
| १८) अलीकडील ओळखता येणारा पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर चिकटवला आहे काय? व अर्धी स्वाक्षरी फोटो वर व अर्धी स्वाक्षरी अर्जावर येईल आशा पद्धतीने स्वाक्षरी केली आहे काय? | |
| १९) अर्जाच्या खालील प्रतिज्ञापतत्रावर स्वाक्षरी केली आहे काय? | |

**उमेदवाराची स्वाक्षरी :-** ______________________

**उमेदवाराचे संपूर्ण नाव:-** ______________________

**ठिकाण :-**_________

**दिनांक:-** __________